# प्र मा ण प त्र

प्रकाश गणपती कांबळे यांनी 'मुलींची शैक्षणिक वंचना : कोल्हापूर जिल्ह्यातील दोन खेड्यांचा अभ्यास' हा शोध प्रबंध शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विषयाच्या एम्.फिल्. पदवीकरिता अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सादर केला आहे.

प्रकाश कांबळे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली हा शोध प्रबंध स्वतंत्ररित्या लिहिला असून तो मूळ आहे आणि इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

डॉ. एस्.एम्. दहिवले
मार्गदर्शक,
समाजशास्त्र-विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

कोल्हापूर :
दिनांक :२६: ९:१९८९.

# प्र ति ज्ञा

' मुलींची शैक्षणिक वंचना : कोल्हापूर जिल्हातील दोन खेड्यांचा अभ्यास ' हा शोध प्रबंध मी प्रत्यक्ष पाहणी आणि माहितीच्या आधारे शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विषयाच्या एम्. फिल्. - पदवीकरिता अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सादर करीत आहे.

मी हा शोध प्रबंध माझे मार्गदर्शक, डॉ. एस्. एम. दहिवले यांच्या मार्गदर्शनाखाली वास्तव स्वरूपातील उपलब्ध माहितीच्या आधारे स्वतंत्ररित्या लिहिला असून अभ्यास विषयाची वस्तुनिष्ठता उजेडात आणली आहे.

प्रकाश गणपती कांबळे,
संशोधक.

कोल्हापूर :
दिनांक :२६:५:१९८९.

# प्रस्तावना

सर्वसाधारणपणे, समाजात डोळसपणे नजर टाकली तर शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे पहावयास मिळते. प्राचीन काळापासून ते ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेपर्यन्त शिक्षणाचे दरवाजे केवळ विशिष्ट जाती समूहाच्या लोकांच्यासाठीच उघडे ठेवण्यात आले होते. आणि इतर जाती समूहांच्या लोकांना शिक्षणाच्या संधीपासून पूर्णत: वंचित ठेवण्यात आले होते. याचा परिणाम त्या काळात निरक्षरता व अज्ञान यात फार मोठी वाढ होण्यात झाला.

ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेनंतर शिक्षणप्रसाराला हळूहळू गती देण्यात आलेली दिसून येते. सन १८१८ साली माउंट स्टुअर्ट एल्फिस्टन हे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर झाल्यानंतर त्यांनी मुंबई आणि इतर जिल्ह्यात शाळा उघडण्यास प्रोत्साहन दिले. इ.सन १८५४ च्या वुडच्या खलीत्याप्रमाणे सन १८५५ पासून भारतीय शिक्षणपध्दतीला ब्रिटिशांनी त्यांच्या देशाप्रमाणे राबविण्यास सुरुवात केली. शिक्षण प्रसाराला जोर देण्याच्यादृष्टीने स्वातंत्र्यपूर्वकाळात निरनिराळे शिक्षण आयोग स्थापून शिक्षण सुधारणेच्या रचना आणि पुनर्रचना करण्यात आल्या. परंतु शिक्षणप्रसाराला त्याकाळात पोषक परिस्थिती निर्माण होऊ न शकल्यामुळे साक्षरतेत अपेक्षेप्रमाणे वृध्दी घडून आली नाही.

फाळणीपूर्व भारतीय शिक्षण प्रसाराचे मूल्यमापण करता साक्षरतेचे प्रमाण ( १९४१ च्या जनगणनेनुसार )फक्त १६.१ टक्के होते. मात्र स्वातंत्र्य - प्राप्तीनंतर काही शिक्षण तज्ज्ञानी आणि विचारवंतांनी सर्व भारतीयांना शिक्षणाच्या संधीचा लाभ मिळाल्याशिवाय या देशाचा सर्वांगिण विकास घडून येणार नाही हे जाणून त्यांनी पंचवार्षिक योजनांच्याव्दारे शिक्षण -

प्रसारावर लक्ष केन्द्रित केले. भारत शासनाने पंचवार्षिक योजनांच्याव्दारे निरक्षर भारतीयांना साक्षर करण्याच्यादृष्टिने निरनिराळ्या शैक्षणिक संस्था, शालेय इमारती, अध्यापक, शालेय साहित्य आणि पैसा मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला दिसून येतो.

परंतु १८५५ पासून ब्रिटिशांनी भारतीय शिक्षणाला त्यांच्या देशाप्रमाणे सुरुवात करुन आज जवळ-जवळ सव्वाशे वर्षाचा प्रदिर्घ प्रवास संपला असतानाही भारतात अद्याप ( १९८१ च्या जनगणनेनुसार ) फक्त ३६.२ टक्के साक्षरता असल्याचे दिसून येते. म्हणजेच शैक्षणिक प्रगती घडवून आणण्याचे एवढे आटोकाट प्रयत्न होऊनही त्यातून फारसे काही,साध्य झाले असे दिसत नाही. भारतीय ग्रामीण समाजाच्या शैक्षणिक विकासाकडे दृष्टिक्षेप टाकला - असता ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण तर ( १९८१ च्या जनगणनेनुसार ) केवळ २९.५७ टक्के असल्याचे दिसते. यावरुन जवळ - जवळ ७०.०० टक्के भारतीय ग्रामीण निरक्षरांचे भयानक स्वरुप स्पष्ट होते.

शासनाने निरनिराळे शैक्षणिक उपक्रम,कार्यक्रम आणि योजना राबवून गाव तीथं शाळा सुरु केल्या आणि खेड्यातील सर्व जाती धर्माच्या मुलांना शिक्षणाच्या समान संधीचा लाभ घेता यावा यासाठी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. परंतु प्राथमिक शिक्षण सर्वांच्यासाठी मोफत आणि सक्तीचे जरी केले गेले असले तरी खेड्यामध्ये शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांचे प्रमाण काही कमी नाही. एवढे शिक्षण प्रसाराचे प्रयत्न होऊनही खेड्यातील काही मुलांना शिक्षणाच्या संधीचा लाभ का बरे घेता येऊ नये, या चिंतनातून जेव्हा मी निवडलेल्या दोन्ही खेड्यांच्या पाहणी अंती संपादित माहितीचे विश्लेषण केले तेव्हा खेड्यातील मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास मुलांचे कौटुंबिक दारिद्र्य, प्रतिकूल सामाजिक पर्यावरण, असाहाय्यक कौटुंबिक परिस्थिती आणि पालकांची निरक्षरता व अज्ञान इत्यादी विविध

कारणे प्रामुख्याने प्रभावीपणे जबाबदार असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा शासनाला केवळ शालेय इमारती, शैक्षणिक संस्था, अध्यापक, शालेय साहित्य आणि पैसा मोठ्या प्रमाणावर खर्च करुन मुलांची शैक्षणिक वंचिततेची समस्या निवारण करता येणे अशक्य आहे. त्यासाठी शासनाने खेड्यातील मुलांचे कौटुंबिक दारिद्र्य, प्रतिकूल सामाजिक पर्यावरण, असाहाय्यक कौटुंबिक परिस्थिती आणि पालकांची निरक्षरता व अज्ञान अशा मुलांच्या शैक्षणिक प्रगतीस अडसर ठरलेल्या विविध प्रतिकूल गोष्टींचे निराकरण करण्याच्यादृष्टिने व्यापक विधायक कार्यक्रम तयार करुन राबविण्यात यावेत. तरच शिक्षणापासून वंचित राहाणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या संधीचा खऱ्या अर्थाने लाभ मिळणार आहे.

संशोधक,
प्रकाश गणपती कांबळे.

कोल्हापूर :
दिनांक :२६:५ : १९८९.

# ऋणनिर्देश

"मुलांची शैक्षणिक वंचना : कोल्हापूर जिल्ह्यातील दोन खेड्यांचा अभ्यास" या शोध प्रबंधा विषयी माझे मार्गदर्शक, डॉ.एस्.एम्.दहिवले, यांनी सर्व तऱ्हेचे मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. डॉ.एस्.एन्.पवार यांनी शोध प्रबंध वेळेत पूर्ण करण्याच्यादृष्टिने वेळोवेळी आवश्यक त्या सूचना दिल्या. प्रा.डी.श्रीकान्त यांनी आवश्यक साहित्यांचा आधार घेण्यासंबंधी सूचना केल्या. या बद्दल मी त्यांचा ऋणी आहे. इंग्रजी साहित्याचा अभ्यास करताना काही शंका व अडचणी आल्या होत्या, त्या दूर करण्यात माझे जेष्ठ सहकारी मित्र प्रा.एस.बी.साळोखे व प्रा. जी.एम्. शिकलगार यांची मोलाची मदत लाभली. प्रा. के.बी.काटे, प्रा.जी.डी. चौगले व प्रा.ए.बी.पाटील यांनी तक्त्यांच्या आधारे संकलीत माहितीची मांडणी व टक्केवारी काढण्याबाबत महत्वपूर्ण सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

मौजे-सांगाव खेड्यातील श्री.एस्.आर.कांबळे व श्री.एन्.डी.कांबळे यांनी वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबांची माहिती करून दिली व मुलाखतीच्यावेळी उपस्थित राहून सहकार्य केले. ग्रामसेवक श्री.एन्.जी.कदम यांनी एकूण लोकसंख्या व कुटुंबांची माहिती सांगितली, कन्या शाळेचे मुख्याध्यापक, श्री.ज्ञा.गो.पाटील आणि कसबा-सांगावचे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, श्री.न.गो.कुंभार यांनी शाळेची स्थापना व शाळेसंबंधी अन्य माहिती दिली. प्रतिष्ठीत नागरिक, श्री.एम्.जे.पाटील यांनी वंचित मुलांच्या कौटुंबिक परिस्थिती संबंधी माहिती करून दिली. या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. मौजे-म्हाळुंगे खेड्यातील श्री.जी.टी.मोटे यांनी वंचित आणि अवंचित मुलांच्या कुटुंबांची माहिती करून देऊन मुलाखतीच्या वेळी उपस्थित राहून सहकार्य केले. ग्रामसेवक, श्री.डी.एन्.पाटील यांनी एकूण लोकसंख्या व कुटुंबे यासंबंधी माहिती दिली. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, श्री.एस्.जी.पाटील यांनी शाळेची स्थापना व शाळेसंबंधी अन्य माहिती सांगितली, याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे.

टंकलेखक श्री बाळकृष्ण रा. सावंत, कोल्हापूर यांनी शोध प्रबंधाचे अचूक टंकलेखन वेळेत करून दिल्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. तसेच, विद्यापीठ अनुदान आयोग ( दिल्ली ) या संस्थाने एम्.फिल्. पदवीकरिता एक वर्षाची रजा देऊन मला संशोधन करण्याची संधी दिली, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

संशोधक,

कोल्हापूर : प्रकाश गणपती कांबळे.

दिनांक : : :१९८९.

••